**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुभाष अश्रू खैरे
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
मु.पो.खटाव, जि.सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा संचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहसंचालक (उ.शि.),कोल्हापूर विभाग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४९/सातारा/ २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुभाष अश्रू खैरे
शहाजीराजे महाविद्यालय, खटाव,
मु.पो.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२८.११.२००६ |

८ **मूळ माहितीची मागणी**

खटाव येथील शहाजीराजे महाविद्यालयात दि.१.८.१९९० पासून अनुदानित तत्त्वावरची पूर्णवेळ नोकरी केलेली असतानादेखील सदरच्या नेमणुकीस आपण मान्यता दिलेली नाही, सदरच्या दिनांकापासून पदनिश्चिती व वेतननिश्चिती करुन वेतनातील फरक का दिला नाही, खुलासा करावा.

## विवेचन

शहाजीराजे महाविद्यालय खटाव, जि.सातारा येथे आपण पूर्णवेळ नोकरी केली असतानाही त्याला मान्यता का दिलेली नाही व पदनिश्चिती व वेतननिश्चिती करुन वेतनातील फरक का दिला नाही, याची माहिती अपीलकर्ता श्री.सुभाष अश्रू खैरे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत आपल्या अर्जाची दखल घेतली नाही, या कारणावरुन श्री.खैरे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा संचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून आवश्यक ती माहिती मागवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.खैरे यांना उत्तर दिले. परंतु आपल्याला चुकीची माहिती दिली जात असल्याचे व मूळ तक्रार निवारण होत नसल्याचे नमूद करुन श्री.खैरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

शहाजीराजे महाविद्यालयात श्री.खैरे यांची अर्धवेळ अधिव्याख्यातापदी दि.२९.७.१९८९ रोजी नेमणूक झाली. अनुदानित-विनाअनुदानित एकत्रित कार्यभारानुसार दि.१.८.१९९० पासून विद्यापीठाने त्यांच्या पूर्णवेळ नियुक्तीला मान्यता दिली. परंतु त्या दिनांकापासून पूर्णवेळ काम करुनही सहसंचालक (उच्चशिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी आपली पूर्णवेळ सेवा दि.१६.१०.१९९८ पासून ग्राह्य धरली आहे. दि.१.८.१९९० पासून विद्यापीठाने आपल्या पूर्णवेळ नेमणुकीला मान्यता दिलेली असल्यामुळे तेव्हापासून मान्यता मिळून आपली पदनिश्चिती, वेतननिश्चिती केली जावी व फरकाची रक्कम मिळावी, अशी श्री.खैरे यांची मागणी आहे. हा विषय विविध पातळ्यांवरील पत्रव्यवहार, अर्ज, अपिले याद्वारे ते मांडत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीने या संदर्भात श्री.खैरे यांच्याविरुध्द निकाल दिलेला आहे. शिक्षण सहसंचालक कार्यालय आपल्या पूर्णवेळ नियुक्तीला मान्यता न देऊन आपले नुकसान करीत आहेत, असे श्री.खैरे यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. परंतु शिक्षण सहसंचालक कार्यालयाने या बाबतीत सातत्याने लक्ष घालून वेळोवेळी महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी पत्रव्यवहार केला आहे. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मान्यतेचा प्रस्ताव आवश्यक

कागदपत्रांच्या पूर्ततेसह सादर केलेला नाही, त्यामुळे श्री.खैरे यांची वरिष्ठ श्रेणीतील वेतननिश्चिती शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण) कार्यालयाला करता आलेली नाही. त्रुटींची पूर्तता करताच वेतननिश्चितीचे प्रकरण सत्वर निकाली काढता येईल असे शिक्षण सहसंचालक डॉ.बाबासाहेब कदम यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात संबंधित कागदपत्रांसह नमूद केले आहे. 'श्री.खैरे यांच्या पूर्णवेळ नियुक्तीसमयी हे कार्यालय अस्तित्वात नव्हते. त्यांच्या नेमणुकीस शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांची मान्यता घेणे आवश्यक होते. तथापी, आजअखेर अशी मान्यता घेणेत आल्याचे दिसून येत नाही. ते करण्यास आवश्यक असणाऱ्या बाबींची माहितीही जन माहिती अधिकारी व विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी श्री.खैरे यांना वेळोवेळी दिली आहे,' असे डॉ.कदम यांनी या निवेदनात स्पष्ट केले आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करता श्री.खैरे यांना जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत व वस्तुस्थितीची पूर्ण माहिती दिली आहे, असे दिसते. श्री.खैरे यांची मागणी पूर्णवेळ नियुक्तीस मान्यता देण्याची व त्या अनुषंगाने पदनिश्चिती व वेतननिश्चिती करण्याची आहे. त्या संदर्भातील त्रुटींवरील उपाययोजना हा विषय प्रशासकीय कार्यवाहीचा असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

## आदेश

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि.५.७.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. ज्ञानदेव तुकाराम लोंढे<br>आवसेवस्ती, आमराई, देगाव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (माध्यमिक),<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

दि. १ मे १९८० ते दि. २८ जून २००६ पर्यंत सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील माध्यमिक प्रशालेतील एकाच कर्मचाऱ्याने दोन ठिकाणी वेतन घेतलेल्या कर्मचाऱ्याविषयी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या तक्रार अर्जातील कर्मचाऱ्याचे नाव व वेतन घेतलेल्या ठिकाणांचे पत्ते, दोन ठिकाणी वेतन घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबत आलेल्या तक्रारी संदर्भात व ज्यांच्याविषयी तक्रार नाही, परंतु दोन ठिकाणी वेतन घेतलेले आहे अशा कर्मचाऱ्यांच्या संदर्भात उप शिक्षणाधिकारी यांनी उप संचालक, शिक्षण विभाग, पुणे यांच्याकडे काही पत्रव्यवहार केला आहे किंवा नाही, केला असल्यास त्याच्या प्रती सही-शिक्क्यानिशी मिळाव्या, अशी मागणी अपीलकर्ता श्री. ज्ञानदेव तुकाराम लोंढे यांनी जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे केली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास २३ दिवसांचा विलंब केला. माहिती त्याच कालावधीत द्यावयास हवी होती. म्हणून दंडात्मक कारवाईची मागणी श्री. लोंढे यांनी केली आहे. माहितीच्या मागणीत अपीलकर्त्याने शाळेचे नाव दिलेले नव्हते, त्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी श्री. लोंढे यांना कळविले. मागणी स्वयंस्पष्ट असल्याच्या उत्तरानंतर श्री. व्ही. व्ही. जगताप यांनी माहिती दिली. ही बाब लक्षात घेता तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर

श्री. व्ही. व्ही. जगताप हे शास्तीस पात्र ठरतात. दि. २३.२.२००७ च्या पत्रान्वये माहिती दिली आहे. उशीर झाला असला तरी माहिती दिली आहे. असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एस.के.सगरे व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. एम.एन.वीर यांनी लेखी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. माहिती २३ दिवसांच्या विलंबाने दिल्याबद्दल तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री. व्ही. व्ही. जगताप यांना रू. ५७५०/- शास्ती लावण्यात येत आहे. सदरची शास्ती माहे ऑगस्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर २००८ या तीन महिन्यांत वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, १८ माहितीचा अधिकार ००७०००१६१' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी करावी. तसेच त्याबाबतची नोंद त्यांचे सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. ३० .७.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.रामचंद्र गणपत धुमाळ
मु.पो.तक्रारवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

विरुध्द

**अपील क्रमांक/१६२/पुणे/२००६**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी तथा उपसंचालक,
पुनर्वसन (जमीन), जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे-१

**अपील क्रमांक/३३०/पुणे/२००६**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी (पुनर्वसन शाखा)
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे-१

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | १६२+३३०/ पुणे / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | १८.१.२००८ |

३.उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र गणपत धुमाळ
मु.पो.तक्रारवाडी, ता.इंदापूर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हाधिकारी तथा उपसंचालक,
पुनर्वसन (जमीन), जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | दि.२९.५.२००६ (अ.क्र.१६२)<br>दि.९.५.२००६ (अ.क्र.३३०) |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- (अ.क्र.१६२)<br>दि.२६.६.२००६ (अ.क्र.३३०) |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | दि.१७.७.२००६ (अ.क्र.१६२)<br>दि.१६.६.२००६ (अ.क्र.३३०) |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | दि. -- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.१६२/पुणे**

मूळ प्रकल्पग्रसत श्रीमती सिताबाई भिवा पवार यांचा कायदेशीर वारस म्हणून दि.४.५.१९९८ रोजी श्री.प्रल्हाद रघुनाथ वाघ यांना ०.८० आर जमीन लाभक्षेत्रात कोणत्या कागदपत्रांच्या आधारे मंजूर केली, त्याच्या प्रमाणित नकला. श्री.वाघ हे श्रीमती पवार यांचे कायदेशीर वारस आहेत काय. संबंधित जमीन मिळतेवेळी भिगवण परिमंडलासाठी पुनर्वसन मंडल अधिकारी कोण होते.

**अपील क्र.३३०/पुणे**

विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्याकडील अपील क्र.१/२००२, दि.२८.५.२००३ रोजी निकालपत्रातील लेखी युक्तिवादातील मुद्दा क्र.१ मध्ये श्रीमती सिताबाई भिवा पवार यांच्या मृत्यूनंतर श्री.प्रल्हाद रघुनाथ वाघ याचे नांव वारसाहक्काने, मृत्युपत्राच्या आधारे दाखल झाले असे म्हटले आहे त्या मृत्युपत्राची नक्कल.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.रामचंद्र गणपत धुमाळ यांनी दि.९.५.२००६ व दि.२९.५.२००६ रोजी अनुक्रमे जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालय, पुणे व विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे (पुनर्वसन शाखा) यांच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जान्वये मूळ प्रकल्पग्रस्त श्रीमती सिताबाई भिवा पवार यांच्या मृत्युपत्राच्या प्रमाणित नकला मागितल्या होत्या. जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालयाच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडून अर्जाला उत्तर मिळाले नाही. त्यानंतर श्री.धुमाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी तथा उपसंचालक, पुनर्वसन (जमीन) यांच्याकडे अपील केले. त्याचीही दखल घेतली गेली नाही. दि.२९.५.२००६ रोजी केलेल्या अर्जावरुन जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (जमीन), पुनर्वसन यांच्याकडून समाधानकारक माहिती मिळाली नाही म्हणून श्री.धुमाळ यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांच्याकडे अपील केले. त्यानी आदेश देऊनही

आपल्याला माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.धुमाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले दाखल केली आहेत.

मोजे तक्रारवाडी, ता.इंदापूर, जिल्हा पुणे या पुनर्वसित गावठाणातील मूळ प्रकल्पग्रस्त श्रीमती सिताबाई पवार यांचे कायद्याने वारस म्हणून श्री.प्रल्हाद रघुनाथ वाघ यांना ०.८० आर जमीन जिल्हाधिकारी तथा उपसंचालक, पुनर्वसन (जमीन), पुणे यांनी दि.४.५.१९९८ रोजी लाभक्षेत्रात मंजूर केली. त्या संदर्भातील अर्जावर विभागीय आयुक्त, पुणे यांच्यासमोर सुनावणी झाली. श्रीमती पवार यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मृत्युपत्राच्या आधारे श्री.प्रल्हाद रघुनाथ वाघ यांचे नाव वारस हक्काने दाखल झाले, असे त्यावरील विभागीय अयुक्तांच्या दि.२८.५.२००३ च्या निकालपत्रात म्हटले आहे. या मृत्युपत्राची प्रमाणित नक्कल विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे या कार्यालयाकडूनच मिळावी, अशी श्री.धुमाळ यांची मागणी आहे. उजनी व वीर प्रकल्प कार्यालय, इंदापूर, जि.पुणे येथील तत्कालीन पुनर्वसन मंडल अधिकारी यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करुन संबंधित जमीन खोट्या कागदपत्रांच्या आधारे श्री.वाघ यांना मिळवून दिली, असा श्री.धुमाळ यांचा आरोप असून जिल्हा पुनर्वसन कार्यालयातील अधिकारी त्यावर पांघरुण घालीत आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे. आयोगापुढील सुनावणी त्यांनी ते विस्ताराने मांडले.

जन माहिती अधिकारी तथा उपआयुक्त, पुनर्वसन शाखा, पुणे विभाग, पुणे श्री.टी.जी.कासार यांनी श्री.धुमाळ यांचा दि.९.५.२००६ रोजीचा अर्ज कार्यालयात आढळ होत नसल्याचे व श्री.धुमाळ यांना यापूर्वी त्याची कल्पना दिली असल्याचे नमूद केले. दि.२९.५.२००६ रोजीच्या अर्जावर दि.१.६.२००६ रोजी माहिती देण्यात आली. त्यानंतर दि.२१.६.२००६ रोजी श्री.धुमाळ यांनी अर्ज करुन कै.श्रीमती पवार यांच्या मृत्युपत्राच्या प्रतीची मागणी केली. संबंधित प्रत आपल्या कार्यालयात नसून जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (जमीन), पुणे यांच्या कार्यालयात पाठविण्यात आलेली आहे, असे दि.२६.६.२००६ रोजी त्यांना कळविण्यात आले. तसेच संबंधित अर्ज त्या कार्यालयाकडे पाठवून तसे श्री.धुमाळ यांना कळविले, असे श्री.कासार यांनी लेखी व तोंडी नमूद केले. जिल्हा पुनर्वसन अधिकारी, पुणे यांनी श्री.धुमाळ यांना सदर मृत्यूपत्राची प्रत दिली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले व ती प्रत सोबत सादर केली. मात्र संबंधित प्रत आपल्याला विभागीय आयुक्त कार्यालयाकडूनच मिळाली

पाहिजे, असा श्री.धुमाळ यांचा आग्रह आहे. श्री.धुमाळ यांना श्रीमती पवार यांच्या मृत्युपत्राची प्रमाणित प्रत दिली जावी, विशिष्ट कार्यालयाकडूनच ती मिळाली पाहिजे, असा आग्रह धरता येणार नाही.

मिळालेलया जमिनीच्या संदर्भात श्री.धुमाळ यांनी सुनावणीच्या दरम्यान विविध मुद्दे उपस्थित केले. त्यांना देण्यात आलेली जमीन सोलापूर जिल्ह्यात असल्यामुळे त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (जमीन), सोलापूर यांनी देणे योग्य ठरेल .

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिल अमान्य.

(२) विभागीय आयुक्त यांच्यापुढील दि.२८.५.२००३ च्या कामकाजात नमूद केलेल्या कै.श्रीमती सिताबाई भिवा पवार यांच्या मृत्युपत्राची प्रमाणित प्रत जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (जमीन), पुनर्वसन शाखा, पुणे यांनी श्री.धुमाळ यांना नि:शुल्क द्यावी.

(३) कै.सिताबाई भिवा पवार यांचे वारस म्हणून श्री.प्रल्हाद रघुनाथ वाघ यांना दिलेल्या जमिनीचा व त्यासाठी आधारभूत असलेल्या कागदपत्रांचा तपशील जिल्हाधिकारी तथा उपसंचालक (जमीन), सोलापूर यांनी श्री.धुमाळ यांना द्यावा.

(४) वरील आदेशाची पूर्तता करुन संबंधित अधिकाऱ्यांनी दि.२०.७.२००७ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ७/७/२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, कौंसिल
हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.वासुदेव शर्मा
अखिल भारतीय कर्जदार व जमिनदार संघ,
काळेवाडी फाटा, पिंपरी, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(परसेवा),
पुणे जिल्हा नागरी बँक्स असोसिएशन, पुणे-सातारा रोड, पुणे-९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६३ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ श्री.दिनेश चंदेल

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(परसेवा),
पुणे जिल्हा नागरी बँक असोसिएशन, पुणे-सातारा रोड, पुणे-९
विद्यमान-श्री.संतोष कोरे, तत्कालीन-श्री.दिनेश चंदेल

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.८.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.९.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती |
|---|---|
| | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाने दि.२१.५.२००५ रोजी काढलेल्या अध्यादेशाची छायांकित प्रत मिळावी. जामीनदार श्री.अशोक विठ्ठल देशमुख याच्याविरुध्द वसुली दाखला कसा काय दिला, कारण त्यांनी कर्ज मागणी अर्ज, करारपत्र, वचनचिठ्ठी तसेच कोणत्याही कागदपत्रांवर जामीनदार म्हणून सही केलेली नाही. श्री.संजय धाडवे व श्री.अशोक विठ्ठल देशमुख यांच्य विरोधात १०१ चा वसुली दाखल काय बघून दिला, याची माहिती संघटनेला १५ दिवसात द्यावी. |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.वासुदेव शर्मा यांनी दि.२५.५.२००६ च्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) यांच्याकडे वसुली दावा क्र.१०१/२८३६/०५-०६ हा कलम १०१ च्या दाखल्या संदर्भात माहिती मागितली होती. जामीनदार श्री.अशोक विठ्ठल देशमुख यांच्या विरुध्द वसुली दाखला कसा काय दिला व काय बघून दिला, याची माहिती १५ दिवसात द्यावी, अशी मागणी केली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निवेदनात सदर विषयाचा सविस्तर उहापोह केला आहे. त्यामध्ये पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन मर्यादित, पुणे ही सहकारी संस्था माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (एच) नुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत बसत नाही, असे प्रतिपादन केले आहे. श्री.संजय धाडवे (कर्जदार) श्री.महेश धाडवे व श्री.अशोक देशमुख (जामीनदार) यांचे विरोधात अशोक नागरी सहकारी बँक मर्यादित, पिंपरी ने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम १०१ नुसार वसुली दाखला मिळविणेसाठी अर्ज केला होता. त्यावर तत्कालीन सहाय्यक निबंधक यांनी सर्व संबंधितांना संधी देऊन सर्व कागदपत्रांचा विचार करुनच त्यावर निर्णय घेतला आहे. त्यावर सदर निर्णयाविरुध्द अपीलकर्त्यास महाराष्ट्र सहकार संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ नुसार विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग यांचेकडेस पुनर्विलोकन अर्ज करता येईल, असे नमूद केले आहे.

अपीलकर्त्याने प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे अपील दाखल केले होते. मात्र ते विहित मुदतीत नसल्याने व

अपीलकर्त्याची स्वाक्षरी नसल्याने अपील फेटाळण्यात आले. मागितलेली सर्व माहिती अर्जदाराकडे उपलब्ध आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.११.३.२००८ रोजी विशेष अपील निर्गत कार्यक्रमात सादर टिपणीत नमूद केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.३.२००८ च्या पत्रानुसार याच स्वरुपाचे म्हणणे मांडले. यापूर्वीच सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास देण्यात आली असून त्या आधारेच त्याने अन्य मंचापुढे निवेदन केले आहे, असे त्यात नमूद केले आहे.

वरील सर्व बाबी लक्षात घेता तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद, सादर केलेली सर्व कागदपत्रे व निवेदने पाहता असे दिसून येते की, महाराष्ट्र सहकार संस्था कायदा १९६० नुसार कलम १०१ च्या निर्णयाविरुध्द पुनर्विलोकनाची कायद्यात तरतूद असतानाही अपीलकर्त्याने 'माहिती' म्हणून 'खुलासा' जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अशा स्वरुपाची स्पष्टीकरण, जाब, खुलासा अशी विचारणा 'माहिती ' व्याख्येत येत नाही. मात्र पूर्वी माहिती दिली असल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे, हे लक्षात घेता देय अशी सर्व 'माहिती ' अपीलकर्त्यास द्यावी, असा आदेश आयोगाने दि.२९.५.२००८ रोजी सुनावणीअंती दिला होता. त्यानुसार सर्व देय कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास पाठविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.२९.५.२००८ च्या पत्रान्वये आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढील प्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली ठेवणेत येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.१४.७.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

सौ. मृदुला पुरूषोत्तम बारसायडे
रा. मुंढेवाडा, कन्या शाळेजवळ, कापड पेठ,
मु. पो. ता. कोरेगाव, जि. सातारा

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
समाज कल्याण अधिकारी, गट-अ,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१ / सातारा |
| २ | उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी** तथा<br>समाज कल्याण अधिकारी, गट-अ,<br>जिल्हा परिषद, सांगली श्री. बी. ए. सोळंकी | |
| २ | जन माहिती अधिका-यांकडे अर्ज केल्याची तारीख | १८.११.२००५ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | १२.१२.२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १५.२.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

६ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहातील मानधन तत्त्वावरील अधीक्षिका नेमणुकीस जिल्हा परिषदेने मान्यता द्यावयाची असल्यास त्यास कमाल व किमान वयाची अट आहे का, असल्यास किती, त्याबाबत लेखी आदेश त्याची सही शिक्क्याची प्रत. जिल्ह्यातील अशा प्रकारच्या अधीक्षिका नेमणुका किती झाल्या, त्या संस्था, अधीक्षिकांची नावे, पत्ता व वयाची माहिती. शासकीय नियमित श्रेणीवर नेमणुका करताना व मानधन तत्त्वावर नेमणुका, मान्यता देताना असणारे नियम, त्याची माहिती.

## विवेचन

मागासवर्गीय अनुदानित वसतीगृहातील मानधन तत्त्वावरील अधीक्षिका नेमणुकीबाबत व सांगली जिल्ह्यातील संस्थांमधील अधीक्षिकांची नावे, पत्ता इ. माहिती अपीलकर्त्या सौ. मृदुला पुरुषोत्तम बारसावडे यांनी जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे मागितली होती. कार्यालयीन अधीक्षिका, समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद, सांगली यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे सौ. बारसावडे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांच्याकडे अपील केले. त्यांनी अपिलाची दखल घेतली नाही, म्हणून सौ. बारसावडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सौ. बारसावडे यांच्या मातोश्री श्री संत गाडगेबाबा मिशन संस्थेच्या वसतीगृह अधिक्षिका होत्या. त्या निवृत्त झाल्यावर त्या पदावर सौ. बारसावडे यांची नियुक्ती करण्यात आली. श्री संत गाडगेबाबा मिशन संस्थेने त्यांना तसे नेमणूकपत्र दिले. परंतु नियमानुसार त्या वयाच्या अटीस पात्र ठरत नसल्याने समाज कल्याण विभागाने त्यांच्या नियुक्तीस मान्यता नाकारली, असा हा विषय असल्याचे उभय बाजूंच्या निवेदनांवरून स्पष्ट होते. मुंबई उच्च न्यायालयात हा विषय प्रलंबित आहे, असे जन माहिती अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी वर्ग-अ यांनी नमूद केले. सौ. बारसावडे यांना मूळ अर्जानुसार सर्व माहिती देण्यात आली आहे. परंतु जन्म तारखेच्या दाखल्याच्या स्वरूपाची अतिरिक्त माहिती त्यांनी अपिलात मागितल्याचे जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणले. कागदपत्रांवरून त्यास दुजोरा मिळतो. अशा प्रकारे अपिलात अतिरिक्त माहिती मागता येणार नाही.

मूळ अर्जानुसार मागितलेली सर्व माहिती देण्यात आली आहे, मात्र प्रथम अपिलाबाबत अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांनी विहित मुदतीत कार्यवाही केली नाही, हे योग्य नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अमान्य.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार अपिलाची निर्गती विहित मुदतीत करण्याची अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांना समज देण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५.७.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे.
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अविनाश मारुती फरांदे
मु.पो.ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम पाटबंधारे विभाग, कृष्णानगर, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | २१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अविनाश मारुती फरांदे
मु.पो.ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११ श्री.बी.सी.कुंजीर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम पाटबंधारे विभाग, कृष्णानगर, सातारा श्री.बी.एस.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३.१२.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६.५.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>गट नं.८१० ते ८८६ वितरिकेच्या नकाशाची खरी नक्कल. वितरिकेवर १९८० पासून किती रुपये खर्च केले व केव्हा. कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता व नऊ वरील पाटकरी यांना शासनाने नेमून दिलेली कामे व कर्तव्याची माहिती. मार्च १९८० ते डिसेंबर २००५ अखेर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती. |

## विवेचन

धोम पाटबंधारे विभागातील डाव्या कालव्याच्या नकाशाची नक्कल व सन १९८० पासून गट क्र.८१० ते ८८६ वितरिकेवर झालेल्या खर्चाबाबतचा तपशील इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री.अविनाश मारुती फरांदे यांनी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग, कृष्णानगर, सातारा यांच्याकडे मागितली होती. आपल्याला जन माहिती अधिकारी यांनी माहिती अपुरी व वितरिकेचे रेखांकन चुकीचे दिल्याच्या कारणावरुन श्री.फरांदे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-११ यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केवळ पत्राद्वारे अपील अर्ज निकाली काढला, म्हणून श्री.फरांदे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

मौजे ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा येथील धोम डावा कालवा, पोटपाट ९-ब ची अंतिम चारी २५ वर्षे बंद ठेवून १० हेक्टर क्षेत्राला पाणी पुरविले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयाचे नुकसान झाले व शासनाचा चाळीस लाख रुपयांचा महसूल बुडाला, असे प्रतिपादन श्री.फरांदे यांनी केले. सन १९७७ पासूनचा हा प्रश्न असल्याचे त्यांनी सांगितले. श्री.फरांदे यांना चुकीची माहिती दिलेली नाही, विहित मुदतीत व योग्य माहिती देण्यात आली आहे. तसेच तीन वेळा सुनावणीच्या तारखा दिल्या होत्या, परंतु श्री.फरांदे उपस्थित न राहिल्यामुळे अपील फेटाळले, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री.बी.एस.बिराजदार व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता श्री.बी.सी.कुंजीर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. ९-ब च्या लाभक्षेत्रात शेतचारी काढणे, धबधबे विभाजक बांधणे इ. कामे मृद्संधारण विभागामार्फत सन १९७७ मध्ये झाली आहेत. त्याचा मूळ नकाशा आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे त्याप्रमाणे त्याची सत्यप्रत श्री.फरांदे यांना दिली आहे. सन २००४-२००५ पर्यंत मागणी केलेल्या संबंधित बागाईतदारांना पाणी दिलेले आहे. श्री.फरांदे यांनी त्यांच्या गट

क्र.८८८ मधील उसासाठी डिसेंबर २००६मध्ये दिलेला पाणी अर्ज मंजूर करुन प्रत्येक पाळीत त्यांना पाणी दिलेले आहे, असेही जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

दहा हेक्टर क्षेत्राला मागणीप्रमाणे पाणी मिळणे हा श्री.फरांदे यांचा मुख्य विषय असून त्या संदर्भात अधिकाऱ्यांपासून मंत्री पातळीपर्यंत ते विविध ठिकाणी अर्ज करीत आले आहेत. अन्य शेतकऱ्यांशी असलेल्या वादाचा संदर्भही त्याला असल्याचे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मार्च १९८० ते डिसेंबर २००५ या कालावधीत संबंधित विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची नावे, पत्ते आदि तपशील आपल्याला मिळाला नसल्यामुळे माहिती अपुरी आहे, असा मुद्दा श्री.फरांदे यांनी मांडला. उपलब्ध असलेली सर्व माहिती यापूर्वी देण्यात आलेली असल्याचे जन माहिती अधिकारी श्री.बी.एस.बिराजदार यांनी सांगितले, परंतु त्यावेळी कार्यरत असलेल्या व नंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे व पत्ते दिलेले नाहीत. २५ वर्षात एकाही अधिकाऱ्याने आपले कर्तव्य बजावलेले नाही, असे श्री.फरांदे यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे. या स्वरुपाची सरसकट विधाने त्यांनी अनेकदा केल्याचे दिसते.

संबंधित कर्मचाऱ्यांच्या नाव पत्त्यासह माहिती देण्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्यानुसार मार्च १९८० ते डिसेंबर २००५ अखेर कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे उपलब्ध होणारे कार्यकाल व पत्ता आदि तपशील श्री.फरांदे यांना दि.१४.२.२००८ रोजी पाठविल्याचे उपकार्यकारी अभियंता, धोम पाटबंधारे विभाग, सातारा यांचे पत्र आयोगाला सादर करण्यात आले आहे.

## <u>आदेश</u>

अपील अमान्य.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२१.७.२००८.
july-०८ solapursangli ४३-४५

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.[illegible] रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७८/ पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.नामदेव शामराव नालंदे<br>संपादक, सा.कऱ्हा-भिमा टाईम्स शिंदे बिल्डिंग, व्हिल कॉलनी, बारामती, जि.पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गट शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>पंचायत समिती कार्यालय, इंदापूर जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | गटविकास अधिकारी,<br>पंचायत समिती कार्यालय, इंदापूर जि.पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. नामदेव शामराव नालंदे यांनी श्री. सुरेश बबन माने प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद शाळा भादलवाडी, ता. इंदापूर यांच्या नेमणुकीच्या अनुषंगाने सन २००० ते सन २००५ या कालावधीतील माहिती मागितली होती.

माहिती अधिकाऱ्यांनी सदरहू माहितीसाठी रू.१०/- चे शुल्क भरण्याबाबत दि. ४.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले व दि. ११.८.२००६ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती दिली. त्यानंतर अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांच्याकडे अपील दाखल केले. त्यावर सुनावणी घेऊन अपीलकर्त्यास दि. २१.९.२००६ रोजी पुन्हा माहिती पाठविली, सर्व तपशील दिला आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांनी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .[illegible].२००६

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**


राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१


राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विष्णू गणपत राऊळ<br>मु.पो. ता. बार्शी, निर्मल पारिजात हौसिंग, अलिपूर रोड, बार्शी, जि. सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका कृषि अधिकारी, आष्टी, जि. बीड | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, बीड, जि. बीड | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. विष्णू गणपत राऊह यांनी खडकत, ता. आष्टी येथील गट नंबर ४३७, ९ हे. ४४ आर मध्ये सन २००० नंतर डाळींब लागवडीखाली सर्वश्री विष्णू गणपत राऊळ, सुभाष रामचंद्र नलंगे व अजय रघुनाथराव सराफ यांना किती अनुदान मंजूर केले याची माहिती जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, आष्टी यांच्याकडे मागितली होती.

माहिती दि. १.२.२००७ ला मिळाली, मात्र त्यावर दि. ३१.१२.२००६ ची तारीख टाकून मिळाली. माहिती उशिरा मिळाल्याने दंडात्मक कारवाई करावी असे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले. तालुका कृषि अधिकारी कार्यालयाच्या जावक नोंदवहीला दि. ३०.१२.२००६ या दिनांकास टपाल पाठविल्याचे दिसून येते. अपीलकर्त्यास ती उशिरा दिली गेल्याबाबत अपीलकर्त्याने सबळ पुरावे सादर केलेले नाहीत. देय रक्कम [illegible] दोन वर्षे विलंबाने मिळाली. त्याचे व्याज व अनुषंगिक कारवाईची मागणी हा अपीलकर्त्याचा मुद्दा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि. ३१.७.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१८.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | १८८ / सोलापूर | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | कु. प्रेमा सुभा कोणजी<br>तर्फे श्री. अशोक वि.म्हेत्रे<br>मु.पो. भाळवणी (नाय.) ता. पंढरपूर जि.सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथमिक)<br>जिल्हा परिषद, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता कु. प्रेमा सुभा कोणजी यांनी दि. २४.८.१९९५ ते ३०.५.२००६ या कालावधीतील विशेष मागास प्रवर्गातील भरतीच्या अनुषंगाने एकूण ०४ मुद्दयांची माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता आवश्यक माहिती मिळाल्याने सदर अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाल्याचे अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३० .७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९६ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विजयसिंग छत्तरसिंग गुंगेवाले<br>उत्तर संदर बझार, घर क्र.६३, लस्कर, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अधीक्षक, भूमी व मालमत्ता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (विशेष),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

सोलापूर शहरातील जगदंबा चौक ते सिव्हिल चौक येथील अधिकृत व अनधिकृत दुकान खोके दि. २३.११.२००६ रोजी अतिक्रमण पथकाने काढलेले आहेत. (नष्ट केलेली आहेत) त्या खोके धारकांची नावे तपशीलवार मिळावी, अशी माहिती अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, भूमी व मालमत्ता, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

माहिती मिळाली असल्याने तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये मागितलेली माहिती तीस दिवसांत दिली गेली पाहिजे, याची समज जन माहिती अधिकारी यांना देण्यात येत आहे.

पुणे
दि. ४ .७.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१७.०६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९८ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. विजयसिंग छत्तरसिंग गुंगेवाले<br>उत्तर सदर बझार, घर क्र.६३, लष्कर, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | अधीक्षक, भूमि व मालमत्ता,<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सहाय्यक आयुक्त (विशेष),<br>सोलापूर महानगरपालिका, सोलापूर | हजर |

सोलापूर महानगरपालिका, सोलापूर यांनी सन १९७९ साली रोड-साईड स्ट्रीप अधिकृत खोक्याकरिता जागा लँड फीने मंजूर केली आहे, त्याची तपशीलवार माहिती अपीलकर्त्याने मागितली होती.

अपीलकर्त्यास आवश्यक ती माहिती उपलब्ध करून दिलेली असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी व आपली काही तक्रार नसल्याचे अपीलकर्त्याने लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ७ .७.२००८

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**